## प्रेस नोट

### वाशिम येथील 38 मजूर स्वगृही

वरील विषयान्वये कळविणेत येते की, जिल्हयाच्या व राज्याच्या विविध भागातून मजूरांचे पायी चालत जावून होणारे स्थलांतर रोखणेसाठी जिल्हा प्रशासनाकडून विविध उपाय करणेत येत आहेत. शिरुर तालुक्यात अशाप्रकारचे एकूण तीन ठिकाणी निवारागृहे स्थापन करण्यात आली आहेत. अशाच उपाययोजनातर्गत तालुका मानोरा जिल्हा वाशिम येथील 38 मजूरांना दिनांक - 01/04/2020 रोजी थांबविणेत आले होते. सदर व्यक्तींची मौजे कोरेगाव भिमा येथे अल अमीन कॉलेजवरती राहण्याची जेवण्याची व्यवस्था निवारागृहात करण्यात आली होती. तसेच त्यांची नियमित वैदयकीय तपासणी करणेत आली होती. राज्य शासनाने स्थंलातंरित मजूरांना त्यांचे मूळ गावी जाण्याची प्रक्रिया निश्चित करुन दिल्यानंतर वाशिम जिल्हाधिकारी यांची पूर्वपरवानगी घेवून त्यांना दिनांक 04/05/2020 रोजी त्यांचे मूळ गावी पाठवून देणेत आले आहे. सदर सर्व व्यक्ती दिनांक 05/05/2020 रोजी सुखरुप त्यांचे घरी पोहचविणेत आले. तालुक्यात अशाप्रकारचे एकूण तीन ठिकाणी निवारागृहे स्थापन करण्यात आली आहेत. सदर प्रक्रिया श्री. नवलकिशोर राम, जिल्हाधिकारी पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संतोषकुमार देशमुख, उपविभागीय अधिकारी पुणे व श्रीमती लैला शेख, तहसिलदार शिरुर यांनी पार पाडली.

06/05/2020

(संतोषकुमार देशमुख)
उपविभागीय अधिकारी पुणे
उपविभाग पुणे

Scanned by CamScanner